**MHKO120005312022**

## म.सं.कौ.हिं.का. अर्ज २०/२०२२

### निशाणी क्र. ३९ व ४० वरील एकत्रित आदेश

(सोनाली वि. आकाश)

नि. ४० चा अर्ज जाबदारांकडून देणेत आलेला आहे व नि. ३९ चा अर्ज अर्जदार यांनी सादर केला आहे.

२. प्रस्तुत नि. ४० चे अर्जात जाबदार क्र. १ ने असे कथन केले आहे की, अर्जातील संपूर्ण कथने चुकीची आहेत. अर्जदाराला अंतरीम पोटगी दरमहा ५,०००/- मंजूर झाले आहे व न्यायालयाचे आदेशान्वये जाबदार क्र. १ ने रक्कम भरली आहे. परंतु, जाबदार क्र. १ ने नि. १९ ला पोटगीचा आदेश सुधारित करणेकरिता अर्ज दिला होता. सदरचा आदेश गुण दोषावर चालून दि. ०१/०८/२०२४ रोजी तो अर्ज नामंजूर करणेत आला. त्या आदेशाविरद्ध जाबदार क्र. १ ने आदरणीय, जिल्हा न्यायाधीश, कोल्हापूर म.सं.कौ.हिं.का. अपील क्र. ३९/२०२४ दाखल केले आहे व त्यामध्ये अर्जदार हजर झाले असून तो अर्ज न्यायप्रविष्ठ आहे व अर्जदार यांना मूळ प्रकरणात जाबदार यांचेविरुद्ध रिकव्हरी वॉरंट मागता येणार नाही, कारण, कायद्यातील तरतुदीनुसार अर्जदार यांनी स्वतंत्रपणे फौ.प्र.सं. कलम १२८ प्रमाणे अर्ज दाखल करणे आवश्यक आहे व मूळ प्रकरणात असा अर्ज करता येणार नाही. त्यामुळे, अर्ज नामंजूर करावा.

३. प्रस्तुत नि. ४० चे अर्जास अर्जदाराने म्हणणे सादर केले व जाबदार क्र. १ ने पोटगीची रक्कम न भरलेने ती थकीत आहे व जाबदार क्र. १ न्यायालयात हजर राहत नाही व पोटगी भरणेस टाळाटाळ करत आहे, त्यामुळे, अर्ज नामंजूर करावा, अशी विनंती अर्जदाराने केली.

४. प्रस्तुत प्रकरणात आदरणीय जिल्हा न्यायालय, कोल्हापूर यांनी अभिलेख मागविले होते व त्यानंतर अभिलेख माघारी पाठविणेत आले व दि. ०४/११/२०२५ रोजी ते माघारी पाठविणेत आले. त्यानंतर आज रोजी जाबदार क्र. १ व त्यांचे विद्वान

विधीज्ञ  यांना पुकारले असता ते गैरहजर राहिले. प्रस्तुतचा अर्ज हा ब-याच तारखांपासून प्रलंबित होता. त्यामुळे, विना म्हणणे जाबदार क्र. १ विरुद्ध चालविला जात आहे.

५. प्रस्तुत अर्जावर अर्जदाराचे विद्वान विधीज्ञ यांनी युक्तीवाद केला व अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

६. माझे विद्वान पूर्वाधिकारी यांनी अंतरीम पोटगीचा आदेश नि. ८ वर पारित केला आहे व अर्ज अंशतः मंजूर करुन जाबदार क्र. १ ने दरमहा ५०००/- अंतरीम पोटगी द्यावी असा आदेश दि. २२/०६/२०२३ ला केला आहे व नंतर जाबदार क्र. १ ने त्या आदेशात बदल होण्यासाठी म.सं.हि.का. कलम २५ अन्वये तो अर्ज सादर केला. परंतु, तो अर्ज नामंजूर केला व त्यानंतर आदरणीय जिल्हा न्यायालय, कोल्हापूर यांचेकडे म.हिं.सं.का. अपील क्र. ३९/२०२४ दाखल करणेत आले. परंतु, संबंधीत अपील हे प्रलंबित आहे व त्यामध्ये सध्यापर्यंत कोणताही स्थगीती आदेश नाही असे प्रतिज्ञापत्र अर्जदाराने आज रोजी दाखल केले आहे व जरी जाबदार क्र. १ ने त्याने पोटगी रक्कम भरली आहे असे जरी कथन केले असले तरी त्याने पूर्णपणे रक्कम भरली आहे असे दिसून येत नाही व त्याने नि. ३३ अन्वये ३०,०००/- रक्कम भरली आहे व त्यानंतर नि. ३५ व ३६ द्वारे एकूण ७,०००/- भरली आहे व उर्वरित रक्कम थकीत आहे असे दिसून येते व ६३,०००/- रक्कम बाकी आहे असे अर्जदाराने नि. ३९ चे अर्जात कथन केले आहे व नि. ३९ चे अर्जास जाबदार क्र. १ ने म्हणणे दिले नाही, त्यामुळे, अर्ज विना म्हणणे चालविणेत येतो. अर्जदाराचे विद्वान विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, कौ.हिं.म.का. चे तरतुदी विचारात घेतल्यास त्या महिलांचे संरक्षण व हित जोपासण्याकरिता केलेचे दिसते. परंतु, जाबदार क्र. १ यांनी उर्वरित पोटगीची रक्कम न भरलेने अर्जदाराची उपासमार होत असून तिचा उदरनिर्वाह होणे गरजेचे आहे. त्यामुळे, रिकव्हरी वॉरंट चा आदेश रक्कम रु. ६३,०००/- करिता पारित करावा अशी विनंती केली.

७. जरी जाबदार क्र. १ ने अर्जात असे नमूद केले असले की, वसुली अर्ज हा स्वतंत्रपणे फौ.प्र.सं. कलम १२८ अन्वये दाखल करणे अपेक्षित आहे व मूळ अर्जात चालणेस पात्र नाही. परंतु, अंतरीम पोटगीचा आदेश हा प्रस्तुत चे प्रकरणात केला आहे व तो आदेश हा अंतिम स्वरुपाचा आदेश नाही व म.सं.कौ.हिं.का. कलम २८ चे तरतुदीनुसार न्यायालय अंतरीम अर्ज कलम २३(२) नुसार अथवा कलम १२ नुसार

केला असलेस त्याबाबत न्यायालयाला जी योग्य ती प्रक्रिया वाटेल तिचा अवलंब न्यायालय करु शकते. Nothing in sub-Section (1) of Section 28 shall prevent the Court from laying down it's own procedure from disposal of an application u/s 12 or sub-Section (2) of Section 23. यावरुन असे सांगता येवू शकते की, अंतरीम पोटगीचा अर्ज हा फौ.प्र.सं. कलम १२८ अन्वये स्वतंत्रपणे दाखल करायला पाहिला अशा स्वरुपाचे बंधन अर्जदारावर लादले पाहिजे असे म्हणणे उचित होणार नाही. कारण, संबंधीत कायदा कलम २३(१) नुसार संबंधीत कायद्याने दाखल अर्जास न्यायालयाला योग्य ते आदेश अंतरीम अर्जावर करणेचा अधिकार आहे. त्यामुळे, जाबदार क्र. १ ने नि. ४० मध्ये जो आक्षेप घेतला आहे की, स्वतंत्र वसुली अर्ज दाखल करणे बंधनकारक आहे त्यामध्ये तथ्य नाही व त्यामुळे, नि. ४० चा अर्ज नामंजूर होणेस पात्र ठरतो.

८. अर्जदाराने नि. ३९ ला रिकव्हरी वॉरंटची मागणी केली आहे व जरी नि. १९ च्या अर्जावर अथवा अंतरीम पोटगी अर्जावर अपील आदरणीय जिल्हा न्यायालय, कोल्हापूर यांचेकडे दाखल असले तरी, म.सं.कौ.हिं.का. कायद्याचा हेतू (object) विचारात घेता ज्या महिलांवर हिंसाचार झाला आहे. त्या पिडीतेला संरक्षण देणे जरुरीचे आहे. त्यामुळे, जरी अपील दाखल झाले असले तरी ते स्थगीत असलेचे दिसून येत नाही व अर्जदाराला उपासमारीची वेळ येत आहे, या युक्तीवादाचा विचार करता व अंतरीम आदेश अस्तित्वात असलेचा विचार करता त्याचे पालन करणे हे जाबदार क्र. १ चे देखील कर्तव्य आहे. त्यामुळे, तो अर्ज मंजूर करणे जरुरीचे वाटते. सबब, मी खालील आदेश पारीत करतो.

## आदेश

१. नि. ३९ चा अर्ज मंजूर केला जातो व जाबदार क्र. १ विरुद्ध रु. ६३,०००/- साठी रिकव्हरी वॉरंट काढणेत यावे.

२. नि. ४० चा अर्ज नामंजूर करणेत येतो.

NISHANT DIPAK RUDRABHATE

Digitally signed by NISHANT DIPAK RUDRABHATE
Date: 2025.11.20 11:07:28 +0530

**(एन. डी. रुद्रभटे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
गारगोटी

**दिनांक :** १९/११/२०२५